# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात मजूर सहकारी संस्थांच्या कामांच्या सवलतीत वाढ करण्याबाबत**

**(१) १३०५ (०१-०१-२०१५). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मजूर सहकारी संस्थांच्या कामांच्या सवलतीत वाढ करण्याबाबत शासनाने दिनांक ३० मार्च, १९७९, दिनांक ५ डिसेंबर १९८४, दिनांक ११ जानेवारी, २००० व दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ रोजी शासन निर्णय निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मजूर सहकारी संस्थांना निविदा न मागविता देण्यात येणाऱ्या कामाच्या किंमतीच्या मर्यादेत ५ लाख वरुन १५ लाख रुपये पर्यंत वाढ करण्यात आली आहे व वर्षभरात कामे घेण्याच्या मर्यादेत ३० लाख रुपयांवरुन ५० लाख रुपयांपर्यत वाढ करण्यात आली आहे आणि मजूर सहकारी संस्थांच्या वर्गीकरणाचे नुतनीकरण ३ वर्षाऐवजी ५ वर्षानी करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत संस्थांना त्याद्दष्टीने कार्यवाही करण्याकरिता सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात अंतर्भुत करण्यात आले नसल्याने राज्यात बहुतांश सर्वच महानगरपालिकांच्या क्षेत्रात मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगारांना दोन लाखाच्या मर्यादेपलिकडे काम करण्यास मान्यता नसल्यामुळे संबंधितांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू शासन निर्णय महानगरपालिका अधिनियमांत अंतर्भुत न करण्यामागील कारणे काय आहेत व याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२७/९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांना एकूण रू.१०० लक्ष मर्यादेपर्यंत कामे घेता येतील. तसेच रू.३ लक्ष वरील रू.३० लाखापर्यंतची कामे ई-निविदा प्रणाली राबवून मजूर सहकारी संस्थांना देता येतील.

(३) व (४) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम कायद्यातील तरतुदीनुसार सा.बां. विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय महानगरपालिकांना लागू नाही.

---

**ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी पांदण रस्त्यावरुन वाद निर्माण होत असल्याबाबत.**

**(२) ४८३० (०१-०१-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी पांदण रस्त्यावरुन वाद निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब-याच प्रकरणात सहज शक्य असताना पांदण रस्ते मोकळे करण्याच्या प्रक्रीयेत प्रशासकिय यंत्रणाच अडथळा ठरते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पांदण रस्त्यांअभावी अनेक शेतक-यांपुढे शेतात जाण्या येण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास त्यावर शासनाची भूमिका व धोरण काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१९) :** (१) होय,

(२) व (३) गांव नकाशप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले पाणंद/पांधण/पानधन/शेतरस्ते/ शिवाररस्ते/शेतावर जाण्याचे पायमार्ग मोकळे करण्याबाबत मोहिम राबविण्याचे निर्देश क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांना महाराजस्व अभियानांतर्गत शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०१८ अन्वये देण्यात आलेले आहेत.

तसेच नियोजन विभाग, रोहयो प्रभाग यांच्या दिनांक २७.०२.२०१८ च्या शासन निर्णान्वये विविध योजनांच्या अभिसरणामधून "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील नगरभूमापन कार्यालयातील नगरभुमापन अधिकारी पद रिक्त असल्याबाबत**

**(३) २८५२६ (२८-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील नगरभूमापन कार्यालयातील नगरभुमापन अधिकारी हे पद गत दिड वर्षापासुन रिक्त असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इचलकरंजी येथे सध्या नगररचना योजनांच्या फेरफारासाठी विशेष पथक नियुक्त न केल्याने असलेले कार्डांचा नंबर बदलण्याचे काम ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पदावर अधिकाऱ्यांची नियुक्ती तातडीने करण्याची मागणी मंत्री, महसूल यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरचे रिक्त पद भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०४-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) मूळ नगर रचना योजनेची मोजणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार केली जाते. फेरबदलाचे क्षेत्रातील मिळकतींची वस्तुनिष्ठ मोजणी करणेसाठी इचलकरंजी येथे सहाय्यक संचालक, नगर रचना यांचे अधिपत्याखाली नगर रचना योजना क्र. १ व २ इचलकरंजीसाठी विशेष घटक स्थापन केले आहे.
(३) व (४) नगर भूमापन अधिकारी, इचलकरंजी हे पद दि.१०.०८.२०१८ पासून रिक्त नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतजमिनीच्या पुर्नमोजणी कार्यक्रम

**(४) ३४४०४ (२०-०१-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतजमिनीचे अभिलेख सुधारित करण्यासाठी उपग्रहाच्या मदतीने तीन टप्प्यामध्ये मोजणी करण्याचा कार्यक्रम शासनाने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान सुरु केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुनर्मोजणीबरोबरच सर्व भूमापन नकाशाचे डिजिटायझेशन करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदरचे काम कधी सुरु होणार आहे व ते केव्हा पुर्ण करण्यात येणार,
(४) असल्यास, या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात कोणकोणते जिल्हे घेण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१९) :** (१) व (२) राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी करणेबाबत तसेच भूमापन नकाशांचे डिजीटायझेशन करणेबाबत दिनांक ०६.१०.२०१५ रोजी निर्णय शासनाने घेतला आहे.
(३) व (४) दिनांक ०६.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये भूमापन नकाशांचे डिजीटायझेशन करण्यासाठी पहिल्या टप्प्यात पुणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. या ६ जिल्ह्यांमध्ये भूमापन नकाशांचे डिजीटायझेशन करण्यासाठी खाजगी संस्थांची निवड करून दिनांक ०३.०५.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. त्यानुसार सदर जिल्ह्यांमध्ये भूमापन नकाश्यांच्या डिजीटायझेशनचे काम खाजगी संस्थांमार्फत सुरू आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी करण्याचा निर्णय महसूल व वन विभागाच्या दिनांक ०६.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यातील पुणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यात पुनर्मोजणीची कार्यवाही सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने या ६ जिल्ह्यात पुनर्मोजणीची कार्यवाही सुरु करण्यासाठीच्या निविदा दिनांक ३१.०३.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. पुणे व रायगड या २ जिल्हयांसाठी दोन वेळा मुदतवाढ देवूनही ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तसेच अन्य ४ जिल्हयांमध्ये ३ पेक्षा जास्त निविदा प्राप्त झालेल्या असल्या तरी ग्रामीण विकास मंत्रालय, भूमि संसाधन विभाग, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त सूचना नुसार पुनर्मोजणीसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळण्याची शक्यता नसल्याने व पुनर्मोजणीची कार्यवाही अनावश्यकरित्या सुरु करु नये असे कळविण्यात आल्याने सदरच्या निविदा दिनांक ०९.०४.२०१८ रोजी रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पुनर्मोजणीची कार्यवाही अद्याप प्रत्यक्षात सुरु झालेली नाही.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**भारती विद्यापीठ पुणे यांना सांगली येथे शासनाकडून मिळालेल्या जमिनीबाबत**

**(५) ३५६५२ (२०-०१-२०१६). श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारती विद्यापीठ पुणे यांना सांगली महानगरपालिकेजवळील सिटी सर्व्हे नं. ९७० मधील जागा शासनाने काही अटी व शर्तीवर मंजूर केलेली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर बांधकाम झाल्यावर ३७१.२ चौ. मी. जागा शासनास देण्याची तरतूदकेली असतानाही सदर जागा अदयाप हस्तांतरित केली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागेचा वापर व्यापारी पद्धतीने केल्याने जिल्हाधिकारी यांनी भाडे वसुलीची नोटीस देऊनही भाड्याची रक्कमअदयाप भरली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, १५ % व्याजदराने व ५ वर्षाला सुधारित भाडे कराराप्रमाणे भाडे वसूल करण्यात आले आहे काय,
(५) असल्यास, दर १५ वर्षांनी सुधारित भाडे घेण्याचा करार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०४-२०१९) :** (१) होय.
(२) जमीन प्रदान आदेशातील अटींनुसार भारती विद्यापीठ, पुणे या संस्थेने ४७८.८० चौ. मी. बांधकामयुक्त क्षेत्र शासनाकडे हस्तांतरीत करणे आवश्यक होते. संस्थेने यापैकी केवळ १०७.६० चौ.मी. क्षेत्र शासनाकडे दिनांक ०४.०४.१९९७ रोजी हस्तांतरीत केले आहे. उर्वरित क्षेत्र अद्याप हस्तांतरीत करण्यात आलेले नाही.
(३) व (४) १५ टक्के वाणिज्य कारणासाठी संस्थेकडून वापरण्यात येणाऱ्या ६५३.७५ चौ. मी. इतक्या क्षेत्रासाठी संस्थेने दिनांक २८.०६.२०१६ रोजी रु. ५२,८६,५५०/- इतकी रक्कम शासकीय

तिजोरीत भरणा केलेली आहे. तथापि, जिल्हाधिकारी, सांगली यांनी वाणिज्य कारणासाठी बांधकामयुक्त क्षेत्राच्या १५ टक्केच्या मर्यादेत वापरण्यात येणाऱ्या क्षेत्रासाठी दिनांक १०.०५.२०१६ रोजी दिलेल्या नोटीशीनुसार पुर्ण रक्कम संस्थेने शासकीय तिजोरीत अद्याप जमा केली नाही.

(५) व (६) वाणिज्य प्रयोजनासाठी परवानगी दिलेल्या बांधकामयुक्त क्षेत्राच्या १५ टक्के क्षेत्राकरिता परवाना फी व थकित रकमेवरील PLR नुसार व्याजाची रक्कम तसेच शासनाचा हक्क असलेल्या उर्वरीत ३७१.२ चौ. मी. क्षेत्राची भाडेपट्टयाची रक्कम परिगणित करून निर्धारीत रक्कमेची संस्थेकडून वसूली करण्यासंदर्भात प्रस्ताव वित्त विभागाकडे अभिप्रायासाठी सादर केला आहे. सदर प्रकरणी वित्त विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर शासनमान्यतेने वसूलीबाबतची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

## हातकणंगले तालुक्यातील ग्रामीण भागातील गुंठेवारीची ४ हजार प्रकरणे १५ वर्ष प्रलंबित असल्याबाबत

**(६) ३९७३४ (२०-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयातील हातकणंगले तालुक्यातील ग्रामीण भागातील गुंठेवारी नियमितीची ४ हजाराहून अधिक प्रकरणे गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुंठेवारी विकास कायदा, २००१ अन्वये नियोजन प्राधिकारी असलेल्या उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांची मुदत संपल्यामुळे गुंठेवारी नियमितीकरणाची प्रकरणे दाखल करणे बंद करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने हातकणंगले तालुक्यातील ५ गुंठेवारी नियमितीकरण प्रकरणांमध्ये विलंब माफी करून मुदतवाढ देण्याचे आदेश माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ५ प्रकरणांच्या धरतीवर शहर व ग्रामीण भागातील सर्व प्रकरणे दाखल करून घेणेबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०४-२०१९) :** (१) व (२) तत्कालिन मा. मंत्री (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दिनांक.०४/१०/२०१३ रोजीच्या मार्गदर्शनपर दिलेल्या पत्रामध्ये उप विभागीय अधिकारी यांना गुंठेवारी प्रकरणापुरते ग्रामीण भागासाठी स्थानिक नियोजन प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना शासनाकडून देण्यात येतील, तोपर्यंत पात्र गुंठेवारी नियमन प्रकरणामध्ये शासनाच्या आदेशाची प्रतिक्षा न करता कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी कार्यालय, इचलकरंजी

यांचेकडे शहरी गुंठेवारीची प्रकरणे सुरु आहेत. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील दि.३०/०४/२००३ चे आदेशान्वये ग्रामिण भागातील गुंठेवारी अकृषिक आकारणीचे अधिकार ज्या त्या तालुक्यातील तहसिलदार यांना प्रदान करणेत आलेले आहेत. सन २०१२ मध्ये काही ग्रामीण गुंठेवारीची प्रकरणे तहसिलदार, हातकणंगले यांचेकडे वर्ग करणेत आली होती. सदरची प्रकरणे हातकणंगले तहसिलदार कार्यालयाकडून निकाली काढण्यात येवून संबधितांस निकाली समज देणेत आलेले आहेत. त्यामुळे तहसिलदार हातकणंगले यांचेकडे ग्रामीण भागातील गुंठेवारीची प्रकरणे दाखल झाली नसल्याने कार्यवाही करणेत आलेली नाही.

(३), (४) व (५) मा.उच्च न्यायालय मुंबई येथे श्री. अजीत परशुराम सोळसे व इतर यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.९१९०/१४ मध्ये दि. ५/१/२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेशाच्या दिनांकापासून ६ आठवडयाच्या आत नियोजन प्राधिकारी यांच्याकडे गुंठेवारी अधिनियमाच्या कलम ४ (१) खाली गुंठेवारी नियमितीकरणसाठी अर्ज मुदतवाढ मिळणे बाबतच्या अर्जासह सादर करावा व सदर अर्जावर नियोजन प्रधिकारी यांनी ३ महिण्याच्या आत मुदतवाढ देणेबाबत निर्णय घ्यावा असे आदेशित केले आहे. तथापि अर्जदार यांनी नियोजन प्रधिकारी यांच्याकडे अर्ज केल्याचे दिसून येत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) क्रिकेट स्पर्धांसाठी खेळांडूबरोबर केलेले करार नोंदणी व मुद्रांक विभागाकडे नोंदवित नसल्याबाबत**

**(७) ५८३६५ (१९-०८-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये कोणताही करार झाल्यानंतर तो नोंदणी व मुद्रांक विभागाकडे नोंदविणे व त्यापोटी मुद्रांक शुल्क् भरणे बंधनकारक असतांना भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) क्रिकेट स्पर्धांसाठी खेळांडूबरोबर केलेले करार नोंदवित नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करार नोंदविण्यात न आल्यामुळे शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाचा महसुल बुडवणा-या बीसीसीआय यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०५-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ च्या कलम १८ मधील तरतूदीनुसार क्रिकेट स्पर्धेसाठी खेळणाऱ्या खेळाडूंबरोबर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यांनी केलेल्या करारनाम्यांची नोंदणी वैकल्पिक स्वरुपाची असल्याने, असे करार नोंदणी विभागाकडे नोंदविणे अनिवार्य नाही.

मात्र महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतूदीनुसार अशा करारास मुद्रांक शुल्क लावणे बंधनकारक आहे. त्यामुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यांनी क्रिकेटपटू व इतर संस्था/व्यक्ती यांचेबरोबर केलेल्या करारांचे दस्त भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून हस्तगत करण्याची कार्यवाही मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी क्र.२ यांचे स्तरावर सुरु आहे. यासाठी अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई तसेच मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी क्र.२ यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यांना उक्त दस्त मुद्रांक शुल्काच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी नोंदणी व मुद्रांक कार्यालयास सादर करण्याबाबत कळविले आहे.

---

**नेरळ येथील (जि.रायगड) सव्हे नं.५०/१ अ क्षेत्र ०-२२-३ आकार रुपये ४ पैसे ३१ सरकारी आकारफोड जागेबाबत बेकायदा खाजगी झाल्याबाबत**

**(८) ७७०२० (१२-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (जि.रायगड) येथील सर्वे नं.५०/१ अ क्षेत्र ०-२२-३ आकार ४ रुपये पैसे ३१ सरकारी आकारफोड जागा बेकायदा खाजगी झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. महसूल मंत्री यांना दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनामध्ये प्रश्नामध्ये नमूद सर्व्हे क्र.५०/१अ चा उल्लेख केला नसून त्यामध्ये सर्व्हे क्र. ५८/१अ असा उल्लेख केला आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन मिळकतीची विना परवाना विक्री केल्याने सदर मिळकत शासन जमा करण्यात आली होती. तद्नंतर तहसिलदार, कर्जत यांचे दिनांक ०७.०८.२०१४ चे आदेशानुसार सदर मिळकत श्री. रत्नाकर शंकर कोळंबे यांचे नावे करुन दिनांक ०४.०९.२०१५ च्या आदेशान्वये मिळकत विक्री परवानगी देण्यात आली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निवेदनांच्या अनुषंगाने तहसिलदार कर्जत यांचे कार्यालयामार्फत चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली शहरातील महसूल विभागाच्या कर्मचारी वसाहतीची झालेली दुरवस्था**

**(९) ७७२४६ (१२-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील महसूल विभागाच्या कर्मचारी वसाहतीची दुरवस्था झाली असल्याने तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू वसाहतीची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच वसाहतीच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित दोषीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०४-२०१९) :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.वडगांव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी असलेला रस्ता बंद केल्याबाबत**

**(१०) ८४५१९ (१२-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडगांव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील गट क्र. १९७, १९८, २०४, २०६ व २०८ येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत जाणाऱ्या रस्त्यावर गृहनिर्माण सोसायटीने अनधिकृत कपाऊंड टाकून रस्ता बंद केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांनी शेतजमिनीत जाण्यासाठी रस्ता मिळण्याबाबत तहसिलदार, खंडाळा यांच्याकडे दिनांक १० डिसेंबर, २०१२, ६ मार्च, २०१३ व २८ ऑगस्ट, २०१५ व ऑक्टोबर, २०१६ मध्ये तसेच जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे दिनांक ७ जानेवारी, २०१३ व ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरचे अनधिकृत कपाऊंड काढून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीत जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०४-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी तहसिलदार, खंडाळा जि. सातारा यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ प्रमाणे अर्धन्यायिक कामकाज चालवून त्यामध्ये प्रश्नाधिन जमिनीतील कंपाऊंड काढून रस्ता खुला करणेबाबत दिनांक १५/०३/२०१७ रोजी आदेश पारीत केलेले आहेत. सदर आदेशाप्रमाणे प्रत्यक्ष कंपाऊंड काढून रस्ता खुला केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोकळ्या जमिनीवर लावण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्क**
**वाढीचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(११) ८५०१३ (१२-०८-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारणातील मोकळ्या जमिनीवर लावण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काचे दर जास्त असल्याबाबतची तक्रार क्रेडाई मुंबई यांनी केल्यानंतर त्यावर अभ्यास करण्याकरिता समिती स्थापन करण्यासाठी शासनाने मुद्रांक शुल्क वाढीला स्थगिती दिल्याचे अनिल कवडे, महा निरिक्षक, राज्य नोंदणी व मुद्रांक शुल्क यांनी जाहिर केले असल्याचे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थगिती उठवण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास समितीने आवश्यक ती कागदपत्रे तपासून शासनाला सादर केलेल्या अहवालात कोणत्या उपाययोजना सुचविल्या आहेत,

(३) तसेच, अभ्यास समितीने उपाययोजना सुचविल्या नसल्यास मुद्रांक शुल्क वाढीला दिलेल्या स्थगितीची मुदत वाढविण्यात आली आहे काय, तसेच समितीच्या अहवालानंतर मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय घेण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, या स्थगितीच्या निर्णयामुळे शासनाच्या महसुलात किती रुपयांचा तोटा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे व सदर तोटा भरुन काढण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका/ नगरपरिषद क्षेत्रातील जमिन मुल्यदराला नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.१९ मे, २०१७ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आली.

उपरोक्त विषयी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचा अंतरिम अहवाल तथा शिफारशी स्वीकृत करून मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले:-

(i) वार्षिक बाजार मूल्यदर तक्ते तयार करताना ज्या ठिकाणी जमिनींचे प्रत्यक्ष खरेदी विक्रीचे व्यवहार उपलब्ध नाहीत त्या ठिकाणचे जमिनींचे दर ठरविताना केंद्रशासनाच्या वित्त मंत्रालयाच्या GST संदर्भातील अधिसुचना क्र.८/२०१७-Integrated Tax (Rate), दि. २८ जून, २०१७ चा आधार घेण्यात येऊ नये.

(ii) सद्यस्थितीत बांधकाम व्यवसायामध्ये असलेली मंदी लक्षात घेता, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक बाजार मूल्यदर तक्ते तयार करताना दरांमध्ये कोणतीही वाढ न करता सन २०१७-१८ चेच वार्षिक बाजार मूल्यदर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवावेत. असे निर्देश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात यावेत.

(iii) नगर विकास विभागाच्या विनियमांमध्ये अधिमूल्य/शुल्क यांचे दर विहित करताना नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य

यांनी निर्गमित केलेल्या वार्षिक बाजार मूल्यदर तक्त्यातील जमीन दराचा आधार घेण्यात आला आहे. गेल्या काही वर्षातील बाजारमूल्य दर तक्त्यातील जमिनींच्या दरांमधील वाढीचा विचार करता नगर विकास विभागाने त्यांच्या विकास नियंत्रण नियमावलीतील अधिमूल्य/शुल्क यांचे दर वाजवी प्रमाणात कमी करण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करावी.

(iv) वार्षिक बाजारमुल्यदर तक्ते २०१७-१८ या मधील मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रातील जमिन दरांमध्ये दि. ०१/०४/२०१७ पासून केलेल्या वाढीला दि.१९ मे, २०१७ ते दि.१९ सप्टेंबर, २०१७ या ४ महिन्यांच्या कालावधी करिता दिलेली स्थगिती उठविल्यामुळे, उक्त स्थगिती कालावधीतील व्यवहारांवरील मुद्रांक शुल्काच्या तसेच नगर विकास विभागाकडील विनियमानुसार अधिमुल्य/शुल्क आकारणीच्या फरकाची वसूली करावी किंवा कसे ? याबाबत अधिक तपशिलवार अभ्यास करण्याची गरज असल्याचे मंत्रिमंडळ उपसमितीने त्यांच्या अहवालात नमुद केले असल्याने या मुद्दयाबाबतचा अहवाल वेगळयाने सादर करण्यासाठी, मंत्रिमंडळ उपसमितीस आवश्यक मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.मुख्यमंत्री महोदयांना देण्यात यावेत.

उक्त निर्देशानुसार कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

---

**माथाडी कामगारांच्या वडाळा आणि चेंबूर येथील घरसंकुलाचा प्रस्ताव**

**(१२) ८५५८१ (०१-०९-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कामगारांच्या वडाळा आणि चेंबूर येथील घरसंकुलाचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, वडाळा आणि चेंबूर येथे माथाडी कामगारांसाठी उभारावयाच्या घरसंकुलाचा प्रस्ताव निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०४-२०१९) :** (१), (२) व (३) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २१/०१/२००६ अन्वये “माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था” या संस्थेस मौ. चेंबुर,ता. कुर्ला येथील १,७४,३४८ चौ.मी. व मौ. वडाळा आणिक येथील ६५,००० चौ.मी. जमीन ३० वर्षाच्या भाडेपट्याने मंजूर केली आहे.

शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २१/०८/२००९ अन्वये या संस्थेस टी.डी.आर. वापरण्यास तसेच संस्थेस प्रदान करण्यात आलेल्या जमिनीवरील एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्राचा वाणिज्य वापर करण्यास परवानगी दिली आहे.

सदरहू जमीन ही माथाडी कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर करण्यात आली असल्याने, टी.डी.आर. अन्वये उपलब्ध होणाऱ्या नवीन बांधकामामध्ये तयार होणाऱ्या सदनिकां करिता माथाडी कामगारांव्यतिरिक्त इतर कोणासही शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय सभासद म्हणून सामावून घेता येणार नाही, अशी अट घातलेली आहे.

तथापि, सदर संस्थेने माथाडी कामगारांव्यतिरिक्त, शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. २५/०५/२००७ अनुसार पात्र सभासद घेण्यास परवानगी मिळणेबाबत शासनाकडे विनंती केलेली आहे.

त्याचप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका रिट याचिकेमध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २३/१२/२०१४ रोजी आदेश पारीत करुन माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस जमीन वाटपाच्या कार्यवाहीची फेरतपासणी करण्याचे आदेशित केले आहे. त्यानुषंगाने या प्रकरणी मा. मंत्री (महसूल) यांनी त्यांचेकडे दाखल असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणी दिनांक २०/०२/२०१९ रोजी आदेश पारित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऑनलाइन सातबारा सक्तीमुळे निबंधक कार्यालयातील दस्त रखडल्याबाबत**

**(१३) ८६२९२ (१२-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दुय्यम निबंधक कार्यालयात मुद्रांकासह विविध प्रकारच्या दस्तांची नोंदणी केली जात असून सदर दस्त नोंदणीसाठी आवश्यक असलेला सातबारा उतारा ऑनलाइन असावा अशी अट घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या ऑनलाइन सातबारा उताऱ्यामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी असल्याने दस्त नोंदणी प्रक्रिया ठप्प झाली असून अनेक दस्त नोंदणी प्रलंबित होऊन नागरिकांना व्यवहार करण्यात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून दुय्यम निबंधक कार्यालयातील विविध प्रकारचे दस्त नोंदणीची प्रक्रिया तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दस्त नोंदणीच्या वेळी भूमि अभिलेख प्रणालीकडून प्राप्त होणा-या गा.न.नं.७/१२ उता-यामध्ये काही त्रुटी/उणीवा असल्यास, संबंधित महसूल अधिकारी त्यांची ऑनलाईन दुरूस्ती करून देतात व त्यानंतर दस्त नोंदणी होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वडाळा पूर्व येथील "न्यु कफ परेड" नावाच्या इमारतीचे मुद्रांक शुल्क न भरल्याबाबत**

**(१४) ८६५१० (१९-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा पूर्व येथील "न्यु कफ परेड" नावाच्या निवासी आणि व्यावसायिक इमारतीच्या पाच हजार ७२७ कोटी रुपयांच्या जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्क त्या इमारतीचे विकासक लोढा यांनी भरले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई आणि मुद्रांक शुल्क विभागाने ४७३ कोटी रुपये दंडासह मुद्रांक शुल्क भरण्याबाबत विकासकाला नोटीस जारी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने दंड भरण्याच्या आदेशाला स्थगिती देऊन मुळ मुद्रांक शुल्काची रक्कम १ महिन्याच्या आत भरण्याचे आदेश लोढा उद्योग समुहाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एमएमआरडिएने या प्रकरणी लोढा समुहाशी करार करताना शासनाचे नुकसान होऊन लोढा समुहाला आर्थिक फायदा होण्याबाबतच्या अनेक अटींचा करारामध्ये समावेश केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून उक्त विकासकाविरुद्ध तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) "मुंबईतील वडाळा पूर्व (भारवाहक तळ) येथिल ब्लॉक सी मधील ९२६०० चौ.मी.क्षेत्राचा भुखंड, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. ला ६५ वर्षाच्या भाडेकरारावर उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुषंगाने, उक्त जमिनीसंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) व मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि.यांच्यामध्ये दि.०१/०८/२०११ रोजी भाडेपट्टा करार तर दि.२३/०३/२०१४ रोजी सुधारित भाडेपट्टा करार निष्पादित झाला आहे. उक्त भाडेपट्टा करारांतर्गत मोबदला रक्कम रू.५,७२१ कोटी ३३ लक्ष या रकमेवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदींनुसार देय असलेले मुद्रांक शुल्क व शास्ती भरण्याबाबत दि.२८/०४/२०१७ रोजी मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-२ यांनी आदेश जारी केले आहेत.

तथापि, दरम्यानच्या कालावधीत मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-२ यांच्या दि. २८/०४/२०१७ रोजीच्या उक्त आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असता, मा.उच्च न्यायालयाने दि.०४ मे,२०१७ रोजी

आदेश निर्गमित करुन, रु.२०२ कोटी ४९ लक्ष ५० हजार इतके मुद्रांक शुल्क उक्त आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाच्या आत भरण्याचे संबंधित संस्थेला (पक्षकाराला) निर्देश दिले आहेत. तर, रु.२७१ कोटी ३४ लक्ष ३३ हजार इतका दंड भरण्याबाबतच्या मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-२ यांच्या आदेशाला सक्षम अपीलीय प्राधिकाऱ्याचे आदेश होईपर्यंत स्थगिती देऊन उक्त रिट याचिका निकाली काढली आहे. मात्र, मुद्रांक शुल्क भरण्याची मा.उच्च न्यायालयाने दिलेली उपरोक्त ६० दिवसांची मुदत संपण्याच्या १ दिवस अगोदर बेलिसिमो क्राऊन बिल्डमार्ट प्राय.लिमि.(पूर्वीची मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्राय.लि.) यानी मा. उच्च न्यायालयात NOTICE OF MOTION दाखल केली होती. उक्त NOTICE OF MOTION च्या अनुषंगाने, दि.३१/०७/२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयात या प्रकरणी अंतिम सुनावणी झाली असता मा.उच्च न्यायालयाने, आदेशाच्या दिनांकापासून पक्षकाराला रु.१०१ कोटी ऑनलाईन पध्दतीने पुढील दिवसापर्यंत भरण्याची तर उर्वरित रु.१०१ कोटी ४९ लक्ष रक्कम ४५ दिवसापर्यंत भरण्यास मुभा देऊन उक्त NOTICE OF MOTION देखिल निकाली काढली आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार पक्षकार मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांनी दि.०१/०८/२०१७ रोजी ऑनलाईन पध्दतीने ग्रास प्रणालीव्दारे रु.१०१ कोटी शासनखाती जमा केले आहेत. उर्वरित रु.१०१ कोटी ४९ लक्ष मुद्रांक शुल्क वसुलीची तसेच मा.उच्च न्यायालयाच्या दि.०४ मे,२०१७ रोजीच्या निर्देशानुसार मुद्रांक शुल्काच्या दंडाच्या रकमेच्या अनुषंगाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५३(१अ) नुसार मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी (सी.सी.आर.ए.) यांच्याकडे अपीलाची कार्यवाही सुरु असल्याने, या प्रकरणी विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही."

---

**कोडगाव, मुरावाडी, नागोठणे, निडी, वाघळी (ता.रोहा, जि.रायगड) या गावातील मे.पॉलिकेम लि. या खाजगी कंपनीमार्फत खरेदी केलेल्या जमिनी मुळ मालकास परत करण्याबाबत**

**(१५) ८६७२४ (१९-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडगाव, मुरावाडी, नागोठणे, निडी, वाघळी (ता.रोहा, जि.रायगड) या गावातील सन १९९०-९२ दरम्यान मे.पॉलिकेम लि. या खाजगी कंपनीमार्फत औद्योगिक विकासासाठी खरेदी करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी मुळ मालकास परत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.महसूल मंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनी खरेदी करताना कंपनी सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या कुटूंबातील व्यक्तीस नोकरीत सामावून घेतले जाईल असे आश्वासन शेतकऱ्यांना कंपनी व्यवस्थापनाने दिले होते परंतू गत २० ते २५ वर्षाचा कालावधी लोटून सुध्दा कंपनी व्यवस्थापनाने कोणतेही आश्वासन पाळले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीने खरेदी केलेल्या जमिनीचा वापर औद्योगिक कारणासाठी न करता सदर जमिनी परस्पर मे. इमेज होल्डिंग प्रा. लि. या कंपनीला विकली असून सद्यस्थितीत जमिनी विना वापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून शासनाच्या विनावापर पडून असलेल्या जमिनी मूळ मालकास परत करण्याच्या धोरणाप्रमाणे सदर जमिनी त्यांच्या मुळ मालकास परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०५-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) सदर जमीन खरेदी करतांना, कंपनी सुरु झाल्यावर शेतकऱ्यांच्या कुटूंबातील व्यक्तीस नोकरीत सामावून घेतले जाईल, या कंपनी व्यवस्थापनाने दिलेल्या आश्वासनाची प्रथमदर्शनी शहानिशा होऊ शकली नाही.
(३) होय. हे खरे आहे.
(४) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३-एक अ मधील तरतुदीनुसार सदर जमिनी जमीन मालकांना मुळ किमतीस खरेदीखताने परत करण्याबाबत संबंधीत जमीन मालकांनी जिल्हाधिकारी, रायगड यांचे कडे अर्ज केला होता. सदर अर्जावर अर्धन्यायिक कार्यवाही करुन सदर जमिनीत तत्पूर्वीच अकृषिक वापर परवानगी दिल्याने तसेच सदर जमीन कलम २(८) या व्याख्येत मोडत नसल्याने व ही जमीन सन १९९०-९२ या कलावधीत खरेदी करण्यात आलेली असल्याने या जमिनीला पूर्वलक्षी प्रभावाने उक्त अधिनियमाच्या कलम ६३ एक अ च्या परंतुकामधील जमीन पुर्नखरेदीच्या तरतुदी लागू नसल्याने दिनांक २२.०३.२०१६ च्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी अर्जदाराचा जमीन पुर्नखरेदी विनंती अर्ज फेटाळला आहे.
(५) लागू नाही.

---

## राज्यातील अतिक्रमणधारकांना कायमस्वरुपी पट्टे देताना शीघ्र सिध्दगणकानुसार येणाऱ्या किंमतीत कपात करण्याबाबत

**(१६) ८८५२३ (१२-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एखाद्या ठिकाणी १० वर्षांपासून राहत असलेल्या ग्रामीण भागातील अतिक्रमणधारकांना कायम स्वरूपी पट्टे शीघ्र सिद्धगणक दरानुसार दिले जात असून सदरचे दर जास्त असल्यामुळे शीघ्र सिद्ध गणक नुसार येणा-या किंमतीत ७५ टक्के कपात करण्याबाबत किंवा सुट देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१९) : (**१) स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १३ मे, २०१६ रोजी निवेदनाद्वारे या संदर्भात विनंती केली आहे.
(२) "सर्वासाठी घरे-२०२२" या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्राम विकास विभागाने दिनांक १६.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील दिनांक ०१.०१.२०११ पर्यंतची निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमित करण्याची तरतुद आहे. तसेच दि.०१.०१.२००० पूर्वीची ५००चौ.फु. क्षेत्रफळापर्यंत केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करतांना कोणतेही शुल्क आकारले जाणार नसुन त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळासाठी अतिक्रमण नियमानुकुल करतांना अत्यंत माफक दराने शुल्क आकारण्याची तरतुद सदर शासन निर्णयात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हा बाजार समितीमधील व्यापा-यांवर नोटीसा बजावल्याबाबत

**(१७) ८९६८५ (१२-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा बाजार समितीमधील भाडेपट्टा करताना थकित असलेले मुद्रांक शुल्क व त्या वरचा दंड भरण्याबाबत ६०० व्यापा-यांना नोटीसा बजावण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नोटीसांमध्ये दिलेली दंडात्मक रक्कम ही खूप जास्त असल्याने बाजार समितीने योग्य तो निर्णय घ्यावा अशी मागणी व्यापारी संघटनेने संबंधिताकडे केली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
सोलापूर जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील एकूण ६८२ व्यापाऱ्यांना मुद्रांक शुल्क व त्या वरचा दंड भरण्याबाबत सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर यांच्या मार्फत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.
(२) व (३) होय,
व्यापाऱ्यांनी केलेली मागणी तथा म्हणणे नियमानुसार नसल्याने सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर यांनी सुनावणी घेऊन व्यापाऱ्यांची मागणी अमान्य करुन नियमानुसार त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही. त्यानुसार, सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे मार्फत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमानुसार मुद्रांक शुल्क व त्यावरील दंड वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनीक यांच्या मागण्यांबाबत**

**(१८) ९५९६५ (२१-१२-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुद्रांक विक्रेते व दस्तदस्तलेखनिक यांच्या प्रमुख मागण्यांबाबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी मा.महसूल मंत्री यांच्या सोबत बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बैठकीत मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक यांच्या मागण्यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली तथापी अद्याप या मागण्या पूर्ण झाल्या नसल्याने त्यांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक यांच्या मागण्या कोणत्या आहे व त्यासंदर्भात निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे व या प्रकरणी किती कालावधीत निर्णय होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) संपाचा इशारा दिला हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक यांच्या मागण्या खालील प्रमाणे आहेत:-

i) राज्यातील प्रचलित छापिल मुद्रांक विक्री व्यवस्था चालू ठेवून त्यावर मुद्रांक विक्रेत्यांना १० टक्के मनौती मिळावी.

ii) राज्यात सुरु असलेली ई-चलन तसेच e-SBTR ही प्रणाली अधिकृत मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक यांचे मार्फतच राबविण्यात यावी.

iii) ASP (Authorised Service Provider) ही प्रणाली विनाअट अधिकृत मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक यांनाच मिळावी.

iv) मयत मुद्रांक विक्रेत्यांचे वारस यांना वारस हक्काने परवाना मिळावा.

उक्त मागण्यांच्या अनुषंगाने संघटनेच्या शिष्ट मंडळासोबत झालेल्या चर्चेनुसार राज्यातील मुद्रांक विक्रेत्यांना मुद्रांक विक्रीपोटी देण्यात येणाऱ्या कमिशनमध्ये वाढ करता येईल काय? याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करण्यात येत आहे.

___________

**महसूल विभागांतील भूमी अभिलेख स्कॅनिंग करण्यायाबाबत.**

**(१९) ९६९८७ (२१-१२-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महसूल विभागांतील भूमी अभिलेख (सर्व जुनी कागदपत्रे) जतन करण्यासाठी धोरण आखून त्याअंतर्गत सर्व जुनी कागदपत्रे स्कॅनिंग करण्याची निविदा काढली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्कॅनिंग करण्याची कामे पूर्ण झालेली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त स्कॅनिंगचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) महसूल विभागाच्या दि.०६.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील सर्व तहसिलदार, उप अधिक्षक भूमि अभिलेख आणि नगर भूमापन अधिकारी कार्यालयाकडील महत्वाच्या जुन्या भूमि अभिलेखांचे स्कॅनिंगचे काम सुरु असून ते अंतिम टप्प्यात आहे. शासनाच्या मंजूरीनुसार राज्यातील एकूण सुमारे ३४.३४ कोटी पानांपैकी दि.१०.०५.२०१८ अखेर पर्यंत सुमारे ७९% पानांचे स्कॅनिंगचे काम पूर्ण झालेले आहे.

शासनस्तरावरुन तसेच जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाकडून सदर स्कॅनिंगचे काम तात्काळ पुर्ण करुन घेण्यासाठी वेळोवेळी बैठका, व्हीडीओ कॉन्फरन्स तसेच पत्रव्यवहाराव्दारे संबंधित जिल्हाधिकारी, उपसंचालक भूमि अभिलेख, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, उप अधिक्षक भूमि अभिलेख, तहसीलदार तसेच स्कॅनींग काम करणाऱ्या संस्थांना सूचना देण्यात येतात व नियमितपणे कामाचा आढावा घेण्यात येतो.

---

**तिवसा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील नगर पंचायतीला**
**तहसील कार्यालयाची इमारत मिळण्याबाबत**

**(२०) ९७२२९ (२१-१२-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील नगर पंचायतीला तहसील कार्यालयाची सध्या वापरात नसलेली जुनी इमारत हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०४-२०१९) :** (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसिलदार, तिवसा कार्यालयाची जुनी इमारत नगर पंचायत, तिवसा कार्यालयाला हस्तांतरीत करण्याबाबत मा. मंत्री (महसूल) यांना दि.०५/१०/२०१७ रोजी निवेदन दिले होते. त्या अनुषंगाने तहसिलदार, तिवसा यांच्याकडून त्यांच्या दि. ०२/११/२०१७ च्या पत्रान्वये सहायक संचालक, नगर रचना, अमरावती व ७ इतर कार्यालयांचे नाहरकत अभिप्राय/अहवाल मागविण्यात आले आहेत. प्रश्नाधीन जागा व इमारतीचे एकूण मूल्यांकनाची रक्कम नगरपंचायत, तिवसा भरण्यास समर्थ नसल्याबाबत मुख्याधिकारी, नगरपंचायत तिवसा यांनी त्यांच्या दि. २४/०१/२०१९ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविले आहे. तदअनुषांगिक प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयाकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी ही पदे भूमिअभिलेख विभागाकडे वर्ग करण्याबाबत**

**(२१) ९७८७० (२१-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूमिअभिलेख विभागाच्या ई-फेरफार, ऑनलाइन ७/१२, ई-चावडी या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी ही पदे तातडीने भूमीअभिलेख कार्यालयाकडे वर्ग करावीत असा प्रस्ताव जमाबंदी आयुक्तांनी शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावाला शासनाने मान्यता दिली तर भूमी-अभिलेख विभागाचे सदर प्रकल्प वेळेत मार्गी लागण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३ असल्यास, सदर प्रस्तवाला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०४-२०१९) :** (१) होय. जमाबंदी आयुक्तांनी डिजिटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत ई-फेरफार प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी करमणूक कर आस्थापनेवरील कार्यरत असणाऱ्या उपजिल्हाधिकारी-१, तहसिलदार-१, नायब तहसिलदार-१, अव्वल कारकून / मंडळ अधिकारी-२ ही पदे त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवर ई-फेरफार प्रकल्पासाठी “विषयतज्ञ गट” म्हणून वर्ग करण्याची विनंती केली होती.

(२) होय.
(३) करमणूक कर शाखेतील पदे महसूल विभागात ठेवण्याबाबत आणि त्यापैकी १० पदे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अपील शाखेचे सक्षमीकरण करण्याकरीता वर्ग करण्याचा वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला असता वित्त विभागाने दि. २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सुधारीत आकृतीबंध मंजूर होईपर्यंत प्रशासकीय विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करण्यास अनुमती नाही. तसेच करमणूक कर शाखेतील पदे महसूल विभागास ठेवता येणार नाहीत, ही पदे जीएसटी कर प्रणाली हाताळणाऱ्या संस्थेस वर्ग करावे लागतील असे अभिप्राय दिलेले आहेत.

त्यामुळे जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख यांना त्यांच्या आस्थापनेचा आकृतीबंधाचा प्रस्ताव सादर करतांना त्यांच्या कार्यालयास आवश्यक असणाऱ्या अधिकच्या पदांबाबत स्वतंत्र मागणी करण्याचे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुद्रांक विक्रीपोटी विक्रेत्यांना देण्यात येणाऱ्या कमिशनबाबत**

**(२२) ९८१६२ (०१-०१-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुद्रांक विक्रीपोटी विक्रेत्यांना देण्यात येणारे कमिशन ३ रु. वरून १० रु. करण्यासंदर्भात प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना मा. महसूल मंत्र्यानी वित्त विभागाला दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने वित्त विभागाने प्रस्ताव तयार केला आहे काय व सदर वाढ कधीपासून देण्यात येणार आहे .
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१) व (२) मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि.११.१०.२०१७ रोजी मुद्रांक विक्रेत्यांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा झाली आहे. त्यामध्ये या मुद्रांक विक्रेत्यांना ३% ऐवजी ५% मनौती देणे किंवा मुद्रांक विक्री करताना प्रती मुद्रांक रु.१०/- सेवा शुल्क नागरिकांकडून स्विकारण्यास मान्यता देणे या पर्यायांवर वित्त विभागाचे अभिप्राय घेऊन उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.त्यानुसार वित्त विभागाशी विचारविनिमयाची कार्यवाही सुरु आहे.
(३) लागू नाही.

---

**गडगा-कुरुळा-अहमदपूर (ता.कंधार, जि.नांदेड) राज्यमार्गाचे काम सुरु करण्याबाबत**

**(२३) ९८६८५ (२१-१२-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडगा-कुरुळा-अहमदपूर (ता.कंधार, जि.नांदेड) असा राज्यमार्ग मंजूर झाला असून या महामार्गासाठी निधीही मंजूर झाला असल्याचे माहे आक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गामुळे दळणवळणही मोठया प्रमाणात वाढणार असल्याने निविदा प्रक्रिया राबवून सदर महामार्गाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१९) :** (१) होय, हे अशत: खरे आहे. सदर कामास मार्च २०१७ च्या अर्थसंकल्पात रु. ३००.०० लक्ष मंजुर आहे.
(२) रस्ते दुरूस्तीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‍ववत नाही.

---

**ग्रामीण भागातील अकृषक परवानगी ग्रामपंचायत मार्फत देण्याबाबत**

**(२४) ९९१०२ (२१-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घर बांधण्यासाठी महसूल विभागाकडून अकृषक परवानगी घेणे अनेक नागरीकांना शक्य नसल्याने मोठ्या प्रमाणात बांधकाम परवाने मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने ग्रामीण भागातील अकृषक परवानगी ग्रामपंचायत मार्फत देण्यात यावी अशी मागणी मा. ग्रामविकास मंत्र्यांकडे दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१९) :** (१) व (२) अकृषिक परवानगी देण्याच्या प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.एनएपी-०७११/प्र.क्र.८२/ल-५, दिनांक १० ऑगस्ट,२०११ अन्वये क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशा निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, तदनंतर अकृषिक परवानगीची प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करून नविन कलम ४२ब, ४२क आणि ४२ ड समाविष्ट केले आहेत. या कलमांतील तरतुद पाहता, विकास आराखडा आणि प्रादेशिक योजना यामध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीचा विकास आराखड्याप्रमाणे अनुज्ञेय असलेला वापर करण्यासाठी आता स्वतंत्रपणे अकृषिक परवानगीची आवश्यकता राहिलेली नाही. तसेच कोणत्याही गावठाणाच्या महाराष्ट्र जमीन महसूल

संहिता,१९६६ च्या कलम १२२ अन्वये घोषित हद्दीपासुन २०० मीटरच्या परिघीय क्षेत्रातील जमीन अशा क्षेत्राला लागू असलेल्या विकास नियंत्रण विनियमांच्या तरतुदींना अधिन राहून, निवासी प्रयोजनासाठी अथवा प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेनुसार अनुज्ञेय प्रयोजनासाठी अकृषिक वापरात रुपांतरीत केली असल्याचे मानण्यात येईल, अशी तरतूद केलेली आहे. या तरतुदींच्या अंमलबजावणी करीता क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना शासन निर्णय, दिनांक २२ जानेवारी, २०१६, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ व दिनांक १४ मार्च, २०१८ अन्वये दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत.

ग्रामीण भागातील अकृषक परवानगी ग्रामपंचायत मार्फत देण्यात यावी अशी मागणी या विभागाकडे प्राप्त झाल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील रेडिरेकनरच्या दरात वाढ करण्याबाबत**

**(२५) ९९३६५ (२१-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील रेडिरेकनरच्या दरात मागील वर्षी अत्यल्प प्रमाणात वाढ करण्यात आली असून यावर्षी रेडिरेकरनच्या दर मर्यादित ठेवले असल्याचे माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयातील विविध प्रकल्पांसाठी शासनाने अधिग्रहीत केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्यासाठी रेडीरेकनरच्या दरात वाढ होणे आवश्यक असताना सदर वाढ न केल्याने प्रकल्पग्रस्तानी त्याबाबत तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून प्रकल्पग्रस्तांना योग्य व बाजारभावाने मोबदला देण्यासाठी रेडीरेकनरच्या दरात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१) नाही.

वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करताना नोंदणीकृत व्यवहारातील दरातील सरासरी वाढीचा विचार करुन योग्य ती वाढ करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) राष्ट्रीय राज्यमार्ग क्र.३६१ (वळण रस्ता) करिता मौ.लोहा,ता.लोहा, जि.नांदेड येथील संपादित होणाऱ्या शेत जमिनींना रहिवास व बागायती क्षेत्राप्रमाणे मुल्यांकन करणेबाबत व वार्षिक मुल्यदर तक्त मधील दरात सुधारणा करणेबाबत तसेच, बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत ¨वळण रस्ता शेतकरी संघर्ष समित, लोहा, ता.लोहा, जि.नांदेड तर्फ मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांना दि.०४/१२/२०१७ रोजी निवेदन सादर केलेले आहे.

स्थावर मिळकतीच्या हस्तांतरणावर उचित मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यासाठी पर्यायाने अशा मिळकतीच्या उचित बाजारमूल्याचे निर्धारण करण्याकरीता महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निर्धारीत करणे) नियम, १९९५ मधील तरतूदीनुसार प्रत्येक वर्षी जमिन व इमारतींचे सरासरी दर दर्शविणारे वार्षिक बाजारमूल्यदर तक्ते (रेडीरेकनर दर) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचे मार्फत प्रसिध्द केले जातात. उक्त दर हे मार्गदर्शनपर असतात.

प्रकल्प ग्रस्तांना द्यावयाचा मोबदला देताना उक्त प्रकल्पाच्या ठिकाणी स्थित जमिनींचे प्रत्यक्ष नोंदणीकृत व्यवहार, वार्षिक बाजारमूल्यदर तक्ते व त्यासोबतच्या मार्गदर्शक सुचना इ. बाबी विचारात घेऊन यापैकी जास्तीचा दर हा मोबदला म्हणुन देण्याची भूसंपादन अधिनियमामध्ये तरतूद आहे. तथापि, वार्षिक बाजारमूल्यदर तक्त्यातील दर हे मागील वर्षी प्रत्यक्ष झालेल्या नोंदणीकृत व्यवहारांचा अभ्यास करुन तयार करण्यात येतात. प्रकल्पग्रस्तांना अधिक तथा वाढीव मोबदला मिळावा या हेतुने उक्त दर तक्त्यातील दरात वाढ केली जात नाही. त्यामुळे, विविध प्रकल्पांसाठी शासनाने अधिग्रहीत केलेल्या जमिनींचा वाढीव मोबदला देण्यासाठी वार्षिक मुल्यदर तक्त्यांच्या दरात (रेडीरेकनरच्या दरात) वाढ करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा तालुक्यातील कास परिसरातील स्थानिक भूमिपुत्रांची बांधकामे अधिकृत करणेबाबत

**(२६) ९९६१८ (२२-१२-२०१७). श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कास (ता.जावळी, जि.सातारा) पठार परिसरात स्थानिक भूमिपुत्रांनी त्यांच्याच मालकीच्या जागेत छोटी हॉटेल बांधली असून महसूल विभागाने सदर बांधकामे अनधिकृत ठरवून संबंधित व्यावसायीकांवर गुन्हे दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रचलित निकषानुसार दंड आकारणी करून सदर बांधकामे अधिकृत करण्याची मागणी संबंधित व्यावसायिकांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर बांधकामे अधिकृत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०४-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) सातारा ते कास या रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम केलेल्या ६१ धारकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अंतर्गत व ३५ धारकांना महाराष्ट्र रिजनल अँड टाऊन प्लॅनिंग ॲक्टचे कलम ५४ खाली नोटीसा दिल्या आहेत. यापैकी काही अतिक्रमणधारकांनी न्यायालयात दावे दाखल केले आहेत. १० अतिक्रमणधारकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

निकषानुसार दंड आकारणी करून सदर बांधकामे अधिकृत करण्याची मागणी संबंधित व्यावसायीकांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे केली आहे.

सातारा-कास रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे समुद्र सपाटीपासून १००० मीटर उंचीवर आहेत. समुद्र सपाटीपासून १००० मीटर उंचीवरील जागेस सद्यस्थितीत बिनशेती परवानगी दिलीजात नाही. सदर ठिकाणच्या बांधकामाबाबत विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची कार्यवाही संचालक, नगर रचना यांचे स्तरावर चालू असून सदर नियमावलीस शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर मंजूर तरतूदीनुसार या बांधकामाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तीक होईल.

---

**कोल्हापूर, नाशिक, पुणे आणि ठाणे जिल्हयांचे सर्व्हर डाऊन झाल्याने जमिनीचे व्यवहार बंद झाल्याबाबत.**

**(२७) ९९९९५ (२१-१२-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, नाशिक, पुणे आणि ठाणे या जिल्हयांचे महसूल सर्व्हर बीएसएनएल क्लाऊडवर स्थलांतरित केल्याने या जिल्हयांतील आयसरिता ही संगणकीय प्रणाली सुरु नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व्हर सुरु नसल्यामुळे सातबारा तसेच इतर उतारे मिळत नसून जमिनीचे सर्व व्यवहारही ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करून बंद असलेले सर्व्हर तातडीने सुरु करण्याबाबत तसेच पर्याय म्हणून सात बारा व सर्व उतारे ऑफलाईन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि. कोल्हापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील संगणक प्रणाली नादुरुस्त झाल्याबाबत**

**(२८) १००२४४ (२१-१२-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील संगणक प्रणाली नादुरुस्त झाल्याने तालुक्यातील जनतेची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यातील संगणक प्रणाली तातडीने दुरुस्त करण्याबाबत अथवा नवीन संगणक प्रणाली बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) पन्हाळा (जि.कोल्हापूर) या कार्यालयात दि.२५ सप्टेबर, २०१७, २७ सप्टेबर, २०१७ व २८ सप्टेबर, २०१७ या तीनही दिवशी विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने संगणकीय कामकाज बंद होते. तसेच माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये उक्त कार्यालयामधील संगणक प्रणाली कधीही बंद पडलेले नाही. त्यामुळे, पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील संगणक प्रणाली नादुरुस्त झाल्याने तालुक्यातील जनतेची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले हे खरे नाही. तसेच दुय्यम निबंधक पन्हाळा कार्यालयाचे विद्युत देयके ही वेळच्या वेळी भरली गेलेली आहेत. त्यामुळे, उक्त तालुक्यातील संगणक प्रणाली तातडीने दुरुस्त करण्याबाबत अथवा नवीन संगणक प्रणाली बसविण्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही

---

## तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील अभिलेखात पुनर्मोजणी योजनेमुळे झालेली चुकीची नोंदणी दुरुस्त करण्याबाबत

**(२९) १०२१४४ (२१-१२-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील अभिलेखात पुनर्मोजणी योजनेमुळे झालेली चुकीची नोंदणी दुरुस्त करण्यास विलंब होत असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीने मा. महसूल मंत्री यांना दिनांक २३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पुनर्मोजणी योजनेमुळे झालेली चुकीची नोंदणी दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी पुनर्मोजणी योजनेच्यावेळी नावात, क्षेत्रात व नकाशात किरकोळ स्वरुपात तफावत आढळून आल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ व १३५ प्रमाणे अनुक्रमे क्षेत्र व हद्दीमधील चुक दुरुस्ती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. उपरोक्त तरतूदींनुसार नागपूर विभागातील पुनर्मोजणी संदर्भातील तक्रारी अर्जाचा जलद निपटारा करण्याकामी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीविषयी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि

अभिलेख (म.रा.), पुणे यांच्या दि.०७.१२.२०१२ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सविस्तर सूचना देण्यात आल्या असून तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील अभिलेखात पुनर्मोजणी योजनेमुळे झालेली चुकीची नोंदणी दुरुस्त करण्यासंदर्भातील प्रलंबित प्रकरणांवर त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

---

## पुणे जिल्हयात सॉफ्टवेअरमधील अडचणींमुळे ऑनलाईन ७/१२ संबंधीत कामाचा वेग मंदावल्याबाबत

**(३०) १०२२५३ (२१-१२-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात ऑनलाईन ७/१२ प्रणालीमधील अडचणींमुळे ऑनलाईन ७/१२ संबंधीत कामाचा वेग मंदावला असून ही प्रणाली तलाठ्यांना त्रासदायक झाल्याचे तसेच खानापूर (जि.सांगली) तालुक्यात ऑनलाईन सातबारा उतारे चुकीचे निघत असून या उताऱ्यासाठी खाजगी ऑपरेटर सामान्य नागरिकांना त्रास देत असल्याची तक्रार नागरिकांनी मा.सहकार मंत्री यांच्याकडे केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाचा वेग मंदावल्यामुळे ७/१२ उतारे, फेरफार इत्यादी कामासाठी नागरीकांना महिनाभर थांबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुणे जिल्हयात ऑनलाईन ७/१२ प्रणालीमध्ये येणा-या अडचणी दूर करण्याबाबत तसेच खानापूर तालुक्यातील सातबारा उतऱ्यामधील त्रुटी दूर करून नागरिकांना त्रासदायक ठरणाऱ्या खाजगी ऑपरेटरवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी पुणे जिल्ह्यात सर्व्हर स्पीड व नेटवर्क स्पीड मधील अडचणींमुळे संगणकीकृत गा.न.नं.७/१२ संबंधित कामाचा वेग काही काळ मंदावला होता ही बाब खरी आहे. परंतू, सांगली जिल्हयात संगणकीकृत गा.न.नं.७/१२ उतारे चुकीचे निघणे तसेच सदर उताऱ्यांसाठी खाजगी ऑपरेटर सामान्य नागरीकांना त्रास देणे, असे प्रकार घडल्याचे निदर्शनास आले नाही.

---

**मौजे वाणगांव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गावठाण भुमापन मोजणीचे काम पूर्ण करुन नगर भूमापन लागू करणेबाबत**

**(३१) १०२८७७ (२१-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाणगांव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गावठाण भुमापन मोजणीचे काम उपअधिक्षक भुमि अभिलेख, डहाणू या कार्यालयाकडून सन १९९५ साली सुरु करण्यात आले होते परंतु निम्मे मोजणी काम केल्यानंतर मोजणी काम अर्धवट स्थितीत ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाणगांव येथील गावठाण भुमापन मोजणी तात्काळ पूर्ण करुन नगर भुमापन लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सन १९९३-९४ मध्ये मौजे वाणगांव, ता. डहाणू, जि. पालघर येथील भूमापन करावयाच्या मिळकतींची एकूण संख्या ५१०८ अशी होती. तथापि मुंबई-अहमदाबाद महामार्गाचे भूसंपादन संयुक्त मोजणीचे काम व अशा अन्य प्राथम्य कामांमुळे सदर भूमापनाचे काम पूर्ण करणे शक्य झाले नसून आतापर्यंत १०९२ मिळकतींच्या भूमापनाचे काम पूर्ण झाले आहे. मौजे वाणगांव, ता. डहाणू, जि. पालघर येथील विचाराधीन भूमापन गावठाणाची जागा ही, रेल्वे स्टेशन लगत असून २००२ पासून सदर जागेवर बांधकामे व अनेक विकासकामे झाल्याने तेथील मिळकतींच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. उपअधिक्षक भूमि अभिलेख, डहाणू कार्यालयातील उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून हे काम पूर्ण करण्यास आणखी बराच कालावधी लागणे अपेक्षित असल्याने उपसंचालक भूमि अभिलेख कोकण प्रदेश, मुंबई यांना त्यांच्या अधिपत्याखालील काही कर्मचाऱ्यांच्या सेवा अंतर्गत समायोजनाने उपलब्ध करुन देऊन हे काम लवकर पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील महाराष्ट्र - तेलंगाना सीमेवरील १२ गावांत तेलंगाना राज्य विकास कामे करीत असल्याबाबत**

**(३२) १०४९०२ (२७-०३-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील महाराष्ट्र-तेलंगाना सीमेवरील १२ गावामध्ये तेलंगाना राज्य विकासाची कामे करीत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास वारंवार केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागात तेलंगाना राज्य घरकुल, रेशनकार्ड, जात प्रमाणपत्र, इत्यादी सोयी उपलब्ध करून देत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर भागाच्या विकासासाठी तसेच तेलंगाना शासनाला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) जिवती तालुक्यात महाराष्ट्र शासनातर्फे आरोग्य सेवा, रस्ते, विद्युत पुरवठा व इतर मुलभुत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत, तसेच विविध योजना राबविण्यात येत आहेत. या तालुक्याचा मानव विकास निर्देशांक कमी असल्याने विविध योजनेचा आराखडा तयार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### घर खरेदीवरील मुद्रांक शुल्क काढण्याच्या पध्दतीत शासनाने बदल केल्याबाबत

**(३३) १०५००७ (२७-०३-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घर खरेदीवर मुद्रांक शुल्क आकारतांना बांधकाम क्षेत्र (बिल्टअप एरिया) काढण्यासाठी पुर्वी चटई क्षेत्राला (कार्पेट एरिया) सरसकट २० टक्क्यांनी (१.२) गुणले जात होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत मुल्यांकन काढण्याच्या पध्दतीत शासनाने बदल केला असून २० टक्क्या ऐवजी १० (१.१) टक्क्यांनी गुणुन मुद्रांक शुल्क आकारण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या उक्त निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१) होय
(२) व (३) चटई क्षेत्राआधारे बांधकाम क्षेत्र परिगणित करण्यासाठी चटई क्षेत्रामध्ये २०% वाढ न देता, १०% वाढ देऊन, बांधकाम क्षेत्र परिगणित करण्याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, पुणे यांचेकडुन रेरा ॲक्टनुसार चटई क्षेत्र विचारात घेता बांधकाम क्षेत्र परिगणित करणेबाबत मुंबई शहरासाठी व उर्वरित

महाराष्ट्रासाठीची मार्गदर्शक सुचना दि. ०२/०१/२०१८ रोजी निर्गमित केल्या असुन उक्त दिनांकापासुन त्यांचा राज्यामध्ये अंमल करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयातील खुल्या जागा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नावावर करण्याबाबत

**(३४) १०६३४४ (२७-०३-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हातील ग्रामीण व नागरी वसाहतींचा ले आऊट तयार करताना कुपनलिका, उद्यान, मंदिर, सांस्कृतिक सभागृह, ग्रंथालय, अंगणवाडी, बालवाडी, तसेच शाळा बांधण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या जागा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नावे न केल्याने या जागांचा विकास झाला नसून अतिक्रमणाचा धोका निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरोली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) ग्रामपंचायत हद्दीमधील गट क्रमांक ५४३ मधील जागेवर एका विद्यमान ग्रामपंचायत सदस्याच्या मुलानेच अतिक्रमण करत त्या ठिकाणी वीटभट्टी ,स्क्रॅप व्यवसाय, सिलीका स्नॅउ, भाडोत्री खोल्या असे विविध उद्योग सुरू केल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोल्हापूर जिल्हयात विविध प्रयोजनासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या जागा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नावे करण्याबाबत तसेच शिरोली येथील गट क्र. १४३ मध्ये झालेले अतिक्रमण हटवून अतिक्रमण करणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०५-२०१९) :** (१), (२), (३) व (४) "राज्यातील अ, ब व क नगरपरिषदांकरीताच्या विकास नियंत्रण व प्रमाणित नियमावलीनुसार राखून ठेवण्यात आलेल्या सुविधा क्षेत्राचे वापर संबंधित जमीन मालकाने अनुज्ञेय सोयी सुविधांकरीता करणे आवश्यक आहे. तसेच कोल्हापुर जिल्हयाच्या प्रादेशिक योजनेतील विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार ग्रामीण क्षेत्राकरीता संबंधित जमीन मालकाने सदरचा सुविधा भूखंड जिल्हाधिकारी/ संबंधित प्राधिकरणास अनुज्ञेय वापरासाठी विकसित करण्यासाठी हस्तांतरण करणे आवश्यक आहे व त्यानुसार संबंधित प्राधिकरणाने अशा भूखंडाचा विकास आवश्यक प्रयोजनाकरीता करणे गरजेचे आहे. त्यानुसार सार्वजनिक सुविधांसाठी असलेल्या आरक्षणांच्या अनुषंगाने शासकीय जागा मागणीचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार आरक्षित प्रयोजनासाठी जमीन प्रदान करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे."

मौजे- शिरोली ता.हातकणंगले जि.कोल्हापुर ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक ५४३ मधील जागेवर अतिक्रमण झाल्याची बाब तहसिलदार, हातकणंगले यांचेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीत दिसून आली आहे. त्यानुसार मौजे-शिरोली येथील अतिक्रमण बाधीत गटातील जागेची हद्द कायम करण्यासाठी दि. २९.१०.२०१८ रोजी मोजणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार अतिक्रमण निष्कासीत करण्याच्या अनुषंगाने तहसिलदार, हातकणंगले यांच्याव्दारे अतिक्रमणधारक यांना नोटीस देण्यात आल्या असून सद्यस्थितीत अपर तहसिलदार, हातकणंगले यांच्या कार्यालयात अर्ध न्यायिक कामकाज सुरु असून त्यावर अंतिम निर्णय झाल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करण्याचे संकल्पीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहर परिसरात गुप्तधनाकरीता खोदकाम केल्याबाबत**

**(३५) १०६४८५ (१२-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहर परिसरातील शेत सर्व्हे क्रमांक २७० मधील विहिरीलगतच्या शेतात दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुप्तधनाच्या लालसेपोटी खोदकाम केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकांत कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०४-२०१९) :** (१) व (२) बुलढाणा जिल्हयातील सिंदखेडराजा येथील श्री.विलास देविदास टाक यांच्या नविन घराच्या बांधकामासाठी खोदकाम सुरु असताना, त्या ठिकाणी काही चांदीची नाणी खोदकामात सापडल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, तहसिलदार यांचे समक्ष प्रभारी अधिकारी सिंदखेड राजा पोलीस स्टेशन व पंचाचे उपस्थितीत जे.सी.बी.च्या सहाय्याने व्हिडीओ चित्रीकरणामध्ये खोदकाम करण्यात आले. त्यावेळी, या ठिकाणी चांदीचे प्रत्येकी ११.५ ग्रॅम वजनाची एकूण २५८ नाणी मिळून आली. या खोदकामात मिळालेल्या सर्व चांदीच्या नाण्यांचा तहसिलदार, सरकारी पंच आणि प्रभारी अधिकारी सिंदखेडराजा पोलीस स्टेशन यांच्या समक्ष सविस्तर पंचनामा जागीच केला आहे. सदर जप्त नाणी इंडियन ट्रेझर ट्रोव्ह ॲक्ट,१८७८ प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी तहसिलदार, सिंदखेडराजा यांनी ताब्यात घेतेलेली आहेत. या सर्व घटनेचे चित्रीकरण करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टा (ता.वाळवा, जि.सांगली) येथील दुय्यम निबंधक कार्यालय परिसरातील स्टॅम्प व्हेंडरनी स्टॅम्पचा कृत्रीम तुटवडा निर्माण केल्याबाबत**

**(३६) १०८९९४ (२७-०३-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टा (ता.वाळवा, जि.सांगली) येथील दुय्यम निबंधक कार्यालय परिसरातील स्टॅम्प व्हेंडर स्टॅम्पचा कृत्रीम तुटवडा निर्माण करुन शेतकऱ्यांना तसेच नागरीकांना जास्त दराने स्टॅम्प विकत असल्यामुळे तेथील शेतकरी व नागरीकांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढून आपल्या मागण्याचे निवेदन दुय्यम निबंधक, आष्टा यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तक्रारवजा निवेदन देऊनही अद्यापि दुय्यम निबंधक कार्यालयाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त स्टॅम्प व्हेंडरवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) दुय्यम निबंधक, आष्टा यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व मुद्रांक विक्रेत्यांना मागणीनुसार तात्काळ मुद्रांक पुरवठा करण्याबाबत आदेशीत करुन भविष्यात अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्याची ताकीद दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागणी- निजामाबाद आंतरराज्य मार्गावर तेलंगाणा सरकारने महाराष्ट्राच्या हद्दीत ३०० मीटर रस्ता बांधल्याबाबत**

**(३७) १०९१७१ (२७-०३-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथून ६ कि.मी. अंतरावर असलेल्या नागणी-निजामाबाद आंतरराज्य मार्गावर तेलगंणा सरकारने महाराष्ट्राच्या हददीत सुमारे ३०० मीटर रस्ता बांधून त्यावर तेलंगणा सरकारचा बोर्ड लावला असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त भूभाग राज्यात पुन्हा समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) तेलंगणा सरकारने महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत कुठल्याही प्रकारचे नविन रस्त्याचे बांधकाम केलेले नसून केवळ ज्या ठिकाणी दोन्ही राज्याच्या सिमा मिळतात त्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या पृष्ठभागाचे ३०० मी लांबीचे डांबरीकरणाचे नुतणीकरण केलेले आहे. तथापि, दोन्ही राज्याच्या सिमांमध्ये कुठलाही बदल झालेला नाही. तसेच महाराष्ट्राच्या हद्दीत तेलंगाना सरकारने कोणताही बोर्ड लावल्याचे निदर्शनास आलेले नाही.

---

**लातूर जिल्हयातील पूल व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत**

**(३८) १११९७६ (२७-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात सन २०१६ व २०१७ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या पूल व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष निधीची तरतूद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी लातूर ग्रामीण यांनी माहे जानेवारी, २०१८ मधील लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हयात अतिवृष्टीमुळे किती पूल व रस्ते नादुरुस्त झाले आहे व या पुल व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(३) असल्यास, सदर पूल व रस्ते दुरुस्तीसाठी निधी मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) लातूर जिल्हयात अतिवृष्टीमुळे ७ पूल व रस्ते काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाली होती. यासाठी रु. ९१२.९० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

(३) लातूर जिल्हयासाठी सन २०१६-१७ मध्ये अ)गट अ अंतर्गत रु. १५०२.२४ लक्ष ब) गट क अंतर्गत रु. ६२.८९ लक्ष व क) AMC Plan अंतर्गत रु. ११७०.२४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच सन २०१७-१८ मध्ये अ) व्दीवार्षीक देखभाल दुरूस्ती (AMC Non Plan) अंतर्गत रु. १३६९.५३ लक्ष व ब) गट क अंतर्गत रु.७०.०० लक्ष उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध विभागांमधील सातबारा उताऱ्यांमध्ये समानता आणण्याबाबत**

**(३९) १११५४१ (२७-०३-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विभागांमध्ये जमीन धारकांना देण्यात येणा-या सातबारा उतारा देण्याच्या पध्दतीमधील विविधता दूर करण्यासाठी भुमिअभिलेख विभागामार्फत सातबारा उताऱ्यात एक समानता आणण्याचा निर्णय घेतला असून तलाठ्यांना त्यानुषंगाने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक पाहणीच्या नोंदी, कोणत्या पिकाची किती क्षेत्रावर पेरणी झाली याबाबतची माहिती तसेच बिगर शेतीसाठी वेगळा उतारा देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयांच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे व किती कालावधीत या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी महसूल व वन विभागाच्या दि.१३.११.२००२ च्या शासन परिपत्रकान्वये संपुर्ण राज्यात एकाच प्रकारचे अभिलेख असणे अत्यंत गरजेचे असल्याने त्यास अनुसरून LMIS व्दारे गा.न.नं.७/१२ उताऱ्यांचे संगणकीकरण करण्यासाठी आवश्यक दफ्तर अद्यावतीकरणाबाबत सर्वसंबंधितांना निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने, डिजिटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत 'ई-फेरफार' या आज्ञावलीच्या अंमलबजावणीमध्ये ज्या ठिकाणी या निर्देशाचे पालन केले गेले नव्हते त्या सर्व ठिकाणी सदरच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे विविध गा.न.नं.७/१२ उताऱ्यांमध्ये समानता आणण्यात येत आहे. त्यासाठी विभागातील मास्टर ट्रेनर्स, जिल्हा व तालुका स्तरावरील मास्टर ट्रेनर्स मार्फत सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना प्रशिक्षणाव्दारे सुचना देण्यात आल्या असून त्याप्रमाणे संपुर्ण राज्यात याबाबत कार्यवाही सुरू आहे.

तसेच महसूल विभागाच्या दि.१३.११.२००२ च्या परिपत्रकानुसार गा.न.नं. १२ मध्ये नोंदी घेताना हंगाम व पिकांच्या नोंदी कराव्यात व त्या खाली क्षेत्र लिहावे अशा सूचना देण्यात आल्या असून पिकांच्या नोंदीबाबत 'ई-फेरफार' आज्ञावली अंतर्गत Crop Updation Module विकसित करण्यात आले आहे. तसेच डिजिटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत 'ई-फेरफार' आज्ञावली राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्रामार्फत विकसीत करण्यात आली असून त्याअंतर्गत गा.न.नं.७/१२ मध्ये एकसमानता आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही सूरू आहे.

___________

## मेहकर (जि.बुलढाणा )तालुक्यात जमीन खरेदीत शेतकऱ्यांची होत असलेली फसवणूक

**(४०) ११२७३५ (२७-०३-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील समृध्दी महामार्गामध्ये जमीन गेलेले शेतकरी नव्याने दुसरीकडे शेतजमिन घेत असून त्यासाठी त्याबाबतच्या खरेदीसाठी सहाय्यक दुयम निबंधक अर्जनविसामार्फत हजारो रुपये घेत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०६-२०१८) :** (१) अशा आशयाची बातमी दैनिक देशोन्नती मध्ये दि.२२.१२.२०१७ रोजी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) या संदर्भातील चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जमिनीवर भोगवटादार म्हणून शेतकऱ्यांची नावे लावण्याबाबत

**(४१) ११२८०५ (२७-०३-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुकादमगुडा, परमडोली, तांडा, फोटा (बु), लेंडीजाळा, महाराजगुडा, शंकरलोधी, पद्मावती, अंतापूर, इंदिरानगर, येसापूर, पलसगुडा, भोलापठार, लेंडीगुडा (ता.जिवती, जि.चंद्रपूर) या गावातील शेतकरी सन १९६२-६३ पासून तेथे वास्तव्यास असून मतदानाचा हक्क बजावात असतानाही शेतक-यांच्या नावे असलेल्या सातबारावरील शेतजमिनीच्या रकान्यात भोगवट्दार म्हणून “सरकार” अशी नोंद करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गांवे महाराष्ट्र - तेलंगणा सिमेवर असून तेलंगणा सरकार वरील गावात रस्ते, शाळा, ग्रा.पं. पोल इत्यादी टाकुन ही गांवे तेलंगणा राज्यात येत असल्याबाबत पुरावे तयार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त गावातील वरील गावातील शेतक-यांच्या नावे असलेल्या सातबारावरील शेतजमिनीच्या रकान्यात भोगवट्दार म्हणून त्यांचे स्वतःचे नाव लागण्याबाबत तसेच उक्त गावात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१९) :** (१), (२), (३) व (४) जिवती तालुक्यातील मुकादमगुडा, परमडोली, परमडोली तांडा, कोठा (बु), लेंडीजाळा, महाराजगुडा, शंकरलोधी, पद्मावती, अतांपूर, इदिरानगर, मेसापूर, पलसगुडा, भोलापठार, लेंडीगुडा (ता.जिवती, जि.चंद्रपूर) ही १४ गावे महाराष्ट्र-तेलंगणा सिमेवरील वादग्रस्त गावे आहेत. सर्व्हे ऑफ इंडिया यांनी तयार केलेल्या टोपोशिट मध्ये सदरची गावे आंध्र प्रदेश (सध्याचे तेलंगणा) राज्यामध्ये दर्शविलेली आहेत. सदर गावांचे भूमापनाचे काम झालेले नसल्याने अभिलेख उपलब्ध नाही.

जिवती तालुक्यातील १४ गावांना महाराष्ट्र शासनाकडून शाळा, रस्ते, आरोग्यसेवा, ग्रामपंचायत रेशनकार्ड, विद्युतपुरवठा व इतर मूलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच सर्व योजना राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**नवेगावबांध (जि.गोंदिया) तालुक्यातील गिट्टीचे अवैध उत्खनन थांबविण्याबाबत**

**(४२) ११५५९५ (१९-०४-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेगावबांध (जि.गोंदिया) तालुक्यात गिट्टीचे अवैध उत्खनन सुरु असून सदर उत्खाननाकरिता वृक्षाची तोड केली जात असल्याने वनसंपदा नष्ट होणाच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्ष तोडीवर बंदी आणण्याकरिता वनविभागाचे कर्मचारी कार्यरत असून, सदर उत्खनन थांबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०५-२०१९) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात केंद्र सरकारच्या ग्रामिण विकास मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या भुमिअभिलेखांचे संगणिकीकरण करण्याच्या योजनेबाबत**

**(४३) ११५७०० (२८-०३-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिक जिल्ह्यात केंद्र सरकारच्या ग्रामिण विकास मंत्रालयाच्या १००% अनुदानातून भुमिअभिलेखांचे संगणकीकरण करण्याची योजना राबवली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये सात बारा तथा तत्सम उताऱ्यांकरीता शेतकरी तसेच सामान्य जनतेला उताऱ्याची सॉफ्ट कॉपी पेन ड्राईव्ह (स्मृती शलाका) मध्ये देऊन त्याची प्रिंटआऊट खाजगी प्रिंटरने काढल्यानंतर त्यावर अधिकाऱ्यांची सही घेण्याकरीता पुन्हा संबंधित कार्यालयात जावे लागते, हे ही खेरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संकेत स्थळावर जिल्ह्यांतील सर्व तालूक्यांचे पर्याय उपलब्ध आहेत काय तसेच त्यातील संपूर्ण माहिती अद्यावत आहे काय,
(४) नसल्यास, शेतकरी तथा सामान्य नागरीकाला सात बारा तथा भुमिअभिलेख्यांचे इतर दाखले प्राप्ती करीता होत असलेला त्रास कमी करण्याबाबत शासनाने काही उपाययोजना केल्या आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) डिजिटल इंडिया लॅन्ड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन प्रोग्रॅम अंतर्गत नाशिक जिल्ह्यात भूमि अभिलेखांच्या संगणकीकरणाचे कामकाज चालू आहे. तसेच जिवती तालुका वगळता राज्यातील उर्वरित सर्व तालुक्यांतील गा.न.नं. ७/१२ चा संगणकीकृत डाटा, स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करण्यात आला असून 'महाभूलेख' संकेतस्थळावर डिजिटल स्वाक्षरी विरहीत गा.न.नं. ७/१२ हा अवलोकनार्थ मोफत उपलब्ध आहे. नाशिक जिल्ह्यात खातेदारांना विविध शासकीय / कायदेविषयक प्रयोजनार्थ आवश्यक असणारे संगणकीकृत गा.न.नं. ७/१२, उतारे तालुका स्तरावर सेतू केंद्र / आपले सरकार केंद्र तसेच गाव पातळीवर तलाठी यांचेमार्फत वितरीत करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

नाशिक जिल्ह्यातील सर्व महसूली गावांचा गा.न.नं. ७/१२ चा डाटा संकेतस्थळावर उपलब्ध असून मूळ हस्तलिखित नोंदीशी तंतोतंत पडताळून सदर डाटा अचूक करण्याचे काम रि-एडीट मॉडयूल द्वारे सुरू आहे. नाशिक जिल्ह्यातील एकूण १९६६ गावांपैकी ११५३ गावांतील डाटाच्या एडीटचे काम पुर्ण झाले आहे. तसेच सर्व्हर विषयक असणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी नाशिक तालुक्यात दि.०५.०२.२०१८ पासून नाशिक तालुक्याचा डाटा स्थानिक सर्व्हरवर उपलब्ध करून दिलेला असल्यामुळे तालुक्यातील सर्व तलाठी हे ऑफलाईन गा.न.नं.७/१२ उताऱ्याचे अद्यावतीकरणाचे काम करत आहेत. नाशिक जिल्ह्यात खातेदारांना विविध शासकीय / कायदेविषयक प्रयोजनार्थ आवश्यक असणारे संगणकीकृत गा.न.नं. ७/१२, उतारे तालुका स्तरावर सेतू केंद्र / आपले सरकार केंद्र तसेच गाव पातळीवर तलाठी यांचेमार्फत वितरीत करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

---

## करवीर (जि.कोल्हापूर ) तालुक्यात नविन तहसिल कार्यालय बांधण्याबाबत

**(४४) ११८२२५ (२०-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करवीर हा कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका असून या ठिकाणी नविन तहसिल कार्यालय बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी नवीन तहसील कार्यालय बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०४-२०१९) :** (१) व (२) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी करवीर तहसिल कार्यालय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी रु.६,३५,७८,१४०/- किंमतीचे अंदाजपत्रक व एकत्रित आराखडा दि. ०१/१२/२०१८ च्या पत्रान्वये शासनास सादर केले आहेत. सदर अंदाजपत्रकाची तांत्रिक तपासणी करुन निधीच्या उलब्धतेनुसार नविन दायित्व स्वीकारावयाच्या मर्यादेच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील महसूल भवनच्या इमारतीतील फर्निचर व इतर साहित्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४५) १२०४७२ (२०-०७-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील सात रस्ता येथील महसूल भवनच्या इमारतीचे गत नऊ वर्षापासून सुरु असलेले बांधकाम पूर्ण झाले असून केवळ फर्निचर अभावी त्या इमारतीमध्ये कामकाज सुरु झाले नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीतील फर्निचर व इतर साहित्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सहा कोटी रुपये मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त इमारतीतील फर्निचर व इतर साहित्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०४-२०१९) :** (१), (२) व (३) सोलापूर शहरातील महसूल भवन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर इमारतीमधील फर्निचरसाठी रु. ६६९.९८ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक विभागास प्राप्त झाले आहे. सदर अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आले असता त्या विभागाने अंदाजपत्रकासंदर्भात काही मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्यांची पूर्तता करण्याबाबत जिल्हाधिकारी सोलापूर यांना कळविण्यात आले आहे. त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार फर्निचरच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लाहे, कलमगाव, साखरोली, आसनगाव व उंबरखांड (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील सव्वाशे एकर जमिन शासन जमा करण्याबाबत**

**(४६) १२११४८ (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाहे, कलमगाव, साखरोली, आसनगाव व उंबरखांड (ता.शहापूर, जि.ठाणे) या गावांमधील ३ हजार ७८८ गुंठे एकंदरीत सव्वाशे एकर जमिन शासन जमा करण्याचे आदेश महसूल विभागाने तहसिलदार, शहापूर यांना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने सदर जमिन शासन जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१९) :** (१) व (२) यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी भिवंडी यांनी दि.२४.३.२०१७ च्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत, तहसिलदार शहापूर यांना सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, शहापूर यांनी महाराष्ट्र कुळकायदा व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ७०अ, ८४अ, ८४ब, ८४क अन्वये चौकशी करुन दिनांक २५.५.२०१८ रोजी च्या आदेशान्वये मौजे कळमगाव, लाहे व सावरोली बु.येथील सदर मिळकती शासन जमा करण्याचे अर्धन्यायिक आदेश पारित केले आहेत. तहसिलदार, शहापूर यांचे उक्त आदेशानुसार सदर मिळकती च्या अधिकार अभिलेखात महाराष्ट्र शासन अशी नोंद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पाच मोठया पूलांच्या देखभाल आणि दुरुस्तीच्या प्रस्तावाबाबत

**(४७) १२१३०५ (२०-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पाच मोठया पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून तीन नव्या पूलांना मात्र यातून वगळले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्ट्रक्चरल ऑडिटच्या अनुषंगाने या पाच मोठया पूलांच्या देखभाल आणि दुरुस्तीकरिता दोन कोटी रुपये मिळण्याबाबतचा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावास मंजुरी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

स्ट्रक्चरल ऑडिट झालेल्या पाच मोठया पुलापैकी शिरढोण पुलाचे दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे, तसेच स्ट्रक्चरल ऑडिट अहवालानुसार औरवाड येथील जुना पूल धोकादायक असल्याने वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे, हायब्रीड ॲन्युएटी अंतर्गत अर्जुनवाड व दिनकराव यादव या पुलांच्या दुरुस्तीचे काम केले जाणार असून, कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे व उर्वरित अंकली पूलांचे निधी निकष व प्राध्यन्यक्रमानुसार सादर करण्याचे नियोजन राहील.

वरील तीन्ही पूल धोकादायक नसून पूलावरून वाहतुकीस सुरळीत चालू आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व शेतक-यांच्या शेतजमिनींची मोजणी करुन त्याची बांध निश्चिती करण्याबाबत**

**(४८) १२२१४५ (२०-०७-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शेतक-यांच्या शेतजमिनींची महसूल विभागामार्फत मोजणी करुन या जमिनींची बांध निश्चिती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत तसेच मोजणी व बांध निश्चितीसोबत शेत रस्ते खुले करण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१९) :** (१) व (२) राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी करण्याचा निर्णय महसूल व वन विभागाच्या दिनांक ०६.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला होता. सदर शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यातील पुणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यात पुनर्मोजणीची कार्यवाही सुरु करण्यास मान्यता दिलेली होती. त्याअनुषंगाने या ६ जिल्ह्यात पुनर्मोजणीची कार्यवाही सुरु करण्यासाठीच्या निविदा दिनांक ३१.०३.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. पुणे व रायगड या २ जिल्हयांसाठी दोन वेळा मुदतवाढ देवूनही ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तसेच अन्य ४ जिल्हयांमध्ये ३ किंवा जास्त निविदा प्राप्त झालेल्या असल्या तरी ग्रामीण विकास मंत्रालय, भूमि संसाधन विभाग, नवी दिल्ली यांचेकडील सूचनांप्रमाणे पुनर्मोजणीसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळण्याची शक्यता नसल्याने व पुनर्मोजणीची कार्यवाही अनावश्यकरित्या सुरु करु नये असे कळविण्यात आल्याने सदरच्या निविदा दिनांक ०९.०४.२०१८ रोजी रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पुनर्मोजणीची कार्यवाही प्रत्यक्षात सुरु झालेली नाही.

त्याचप्रमाणे नियोजन विभाग, रोहयो प्रभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.रोहयो-२०१७/प्र.क्र..२७९/रोहयो-१०अ, दिनांक २७.०२.२०१८ व १२.१०.२०१८ अन्वये "पालक मंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" अतर्गत शेत/ पाणंद रस्ता अतिक्रमण मुक्त करणेची कार्यवाही

करण्याबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तालुका स्तरावरून महसूल विभाग व इतर संबंधित विभागाकडून कार्यवाही करणेत येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेढे व परशुराम (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(४९) १२३२११ (२०-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेढे व परशुराम (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांच्या राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ (मुंबई-गोवा) च्या चौपदरीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर देव भार्गवराम, कुळ व खोत अशी नावे असल्यामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील शेतकऱ्यांनी १००% मोबदला मिळाल्याशिवाय गावातील महामार्ग चौपदरीकरणाचे काम सुरू करू देणार नसल्याचा इशारा दिला असून मा.मुख्यमंत्री, मा.महसूलमंत्री व मा.सामाजिक न्याय मंत्री यांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये निवेदन देऊन विशेष बाब म्हणून या पिढ्यानपिढ्या जमीन कसणाऱ्या कुळांना न्याय देणेबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी अखिल भारतीय किसान सभेच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत याबाबत दोन महिन्यात धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून पेढे व परशुराम येथील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०४-२०१९) :** (१), (२), (३) व (४) देवस्थान जमिनींच्या मूल्यांकनाबाबत देवस्थान व कुळे यांना किती प्रमाणात नूकसान भरपाई रक्कम अदा करण्यात यावी याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीईव्ही-३५०५/३३०/प्रक्र.४७/ल-४ दिनांक २६/६/२००६ अन्वये भूसंपादनाच्या मोबदला रक्कमेतील ५० टक्के एवढी रक्कम देवस्थानास व ५० टक्के एवढी रक्कम कुळास देण्यात यावीत असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तरीही, पेढे परशुराम देवस्थान जमिनीमध्ये देवस्थान,वहिवाटदार(खोत) व कुळे अशी गा.न.नं. ७/१२ ला नावे दाखल असल्यामुळे भूसंपादन मोबदला वाटपाबाबत हिस्सेवारी निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच,मौजे परशुराम व पेढे या गावातील सर्व जमिनी देवस्थान इनाम असून सदर जमिनीच्या मालकी हक्काबाबत परशुराम देवस्थान ट्रस्ट, जमिनीचे वहिवाटदार(खोत) व इतर हक्कात जमिनीतील कुळे अशा नोंदी आहेत. भूसंपादित जमिनीतील हिस्सेवारी निश्चित नसल्याने मोबदला वाटप करण्यात आलेला नाही. मौजे

परशुराम व पेढे (ता.चिपळूण जि.रत्नागिरी) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ साठी संपादीत होणा-या जमिनींचे गाव नमुना नं. ७/१२ उता-यावर देवस्थान, वहिवाटदार(खोत) व कुळे अशी नावे दाखल असल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी १०० टक्के जमीनींचा मोबदला मिळाल्याशिवाय चौपदरीकरणाचे काम सुरु करु देणार नाही याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर निवेदनानुसार, उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांच्या कार्यालयात संपादन संस्था व ग्रामस्थांबरोबर बैठक लावण्यात आली असता, सदर बैठकीत उक्त नमूद पक्षांमध्ये सामंजस्याने तोडगा न निघाल्यामुळे सदर दावे मा.जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आलेले असून मोबदला रक्कम मा.जिल्हा न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे. तसेच मौजे पेढे येथील बाधीत बांधकामधारकांची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरुख (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील तहसीलदार कार्यालयात तालुक्यातील इतर शासकीय कार्यालये सुरु करण्याबाबत**

**(५०) १२५०३० (२०-०७-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरुख (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील तहसीलदार कार्यालयाची इमारत सन २००८ मध्ये बांधून पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीमध्ये जागा रिकामी असताना संगमेश्वर तालुक्यातील नोंदणी व मुद्रांक, दुय्यम निबंधक कार्यालय तसेच तालुका कृषी कार्यालय भाड्याच्या जागेत सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीत जागा असताना सदरची कार्यालये भाड्याच्या जागेत सुरु असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरची कार्यालये तहसील कार्यालयाच्या इमारतीमध्ये कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१९) :** (१) व (२) देवरुख, ता.संगमेश्वर येथील तहसिल कार्यालयाचे स्ट्रॉंग रुम व तीन कस्टडीचे काम प्रगतीत आहे. उर्वरित काम पूर्ण झाले असून काम पूर्ण झालेल्या इमारतीचा ताबा दि. २२/०१/२०१८ रोजी घेण्यात आला आहे. या इमारतीत सद्यस्थितीत तहसिल कार्यालय, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उपकोषागार कार्यालय सुरु आहेत. नोंदणी व दुय्यम निबंधक कार्यालयास तहसिल कार्यालयाच्या जुन्या इमारतीतील जागा देण्यात आली आहे. या इमारतीतील काही तांत्रिक व नियमित दुरुस्तीचे काम आणि इतर कामे करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम उपविभाग देवरूख यांना कळविण्यात आले आहे. या कामाची पूर्तता करण्यासाठी काही काळ लागणार असल्याने सद्यस्थितीत दुय्यम निबंधक कार्यालय भाड्याच्या जागेत कार्यरत आहे.

(३) व (४) तहसिलदार इमारतीत दुय्यम निबंधक यांचेकरीता पहिल्या मजल्यावर जागा दर्शविण्यात आली होती. परंतू पक्षकारांच्या सोयीच्या दृष्टीने दुय्यम निबंधक कार्यालयाकडून तळमजल्यावरील जागेची मागणी करण्यात आली. तथापि जागा उपलब्ध नसल्याने दुय्यम निबंधक कार्यालयाने सुचवल्यानुसार जुन्या उपकोषागार कार्यालय इमारतीत पर्यायी जागा देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.